# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०६६/२००९

| | | |
|---|---|---|
| अर्जदार | : | श्री शिवाजी बळीरामजी कंळबे<br>दुर्गानगर मानेवाडा रोड,<br>पोस्ट ऑफिसच्या मागे,<br>नागपूर. |
| | | - विरूध्द - |
| गैरअर्जदार | : | कार्यकारी अभियंता,<br>महाल विभाग,<br>म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,<br>नागपूर. |
| गणपूर्ती | : | 1) श्रीमती मीरा खडक्कार<br>सभापती,<br>ग्राहक गा-हाणे निवारण मंच<br>नाशप, नागपूर.<br><br>2) श्री एस.एफ.लांजेवार<br>कार्यकारी अभियंता तथा<br>सदस्य-सचिव,<br>ग्राहक गा-हाणे निवारण मंच<br>नाशप, नागपूर.<br><br>3) श्रीमती गौरी चांद्रायण,<br>सदस्या<br>ग्राहक गा-हाणे निवारण मंच,<br>नाशप, नागपूर. |

-- आदेश --

पारीत दि. २३.१२.२००९

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक ०८. १२.२००९ रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

<u>अर्जदाराच्या गा–हाण्याचा तपशील</u> :–

सदर तक्रार अर्जकर्त्याने ०८.१२.२००९ रोजी दाखल केलेली आहे त्यांचे म्हणणे असे आहे की फॉल्टी मीटरचे रिडींग दाखवून अवाढव्य विज आकारणी केलेली आहे.

ग्राहकाचे जुलै व ऑगष्ट 2009 चे वीज बिलात अवाढव्य आकारणी झाल्यामुळे योग्य ते सरासरी बिल आकारण्याची मागणी केलेली आहे.

अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षात दिनांक ०६.१०.२००९ रोजी तक्रार केली होती. परंतु तक्रारीचे निवारण झालेले नाही.

गैरअर्जदाराने त्यांचे लिखीत म्हणणे दि. २२.१२.२००९ रोजी मंचात सादर केले आहे. त्यांत सदर ग्राहकाचे तक्रारीचे निरसन करण्यात आलेले आहे असे सांगण्यात आले. गैरअर्जदाराने असे म्हटले आहे की ग्राहकाच्या घरी सर्व उपकरणे व पूर्वीचा सरासरी वापर तसेच नविन मिटरचा वापर या नुसार सर्व हिशोब करून ग्राहकाने रूपये 622=72 भरणे आवश्यक आहे. ग्राहकाच्या तक्रारीचे निवारण करण्यात आलेले आहे.

मंचाने दोन्ही पक्षकाराचे म्हणणे एकुण घेतले.

गैरअर्जदाराने जरी गा–हाण्याचे निरसन झाल्याबद्दल म्हटले आहे तरीही ग्राहकाच्या म्हणण्याप्रमाणे त्याने जुलै 2009 चे 105 युनिटचे बिल रूपये <u>310/–</u>

भरलेले आहे. ती रक्कम परत करण्यात यावी तसेच ऑक्टोबर 2009 च्या बिलात तसेच महिन्यातील विज बिलाच्या रकमेवर रूपये 117 व्याज आकारण्यात आले व ती रक्कम तक्रारकर्त्याने भरलेली आहे. सदर व्याज आकारणी चुकीची असुन ती परत करण्यात यावी असे ग्राहकाचे म्हणणे आहे.

रेकॉर्ड वरील कागदपत्रांचा विचार केल्यावर असे दिसुन येते की ऑक्टोबर 2009 च्या वीज बिलात ग्राहकाने भरलेली सरासरी देयक रक्कम समायोजीत करण्यात आलेली आहे व त्यानंतर 17,480/– चे वीज बिल देण्यात आले. ऑगष्ट 2009 च्या बिलातून जुलै महीन्याचे विज बिल 310=81 रूपये वजा केलेली असल्यामुळे ग्राहक सदर रकमेचा परतावा मागु शकत नाही.

ग्राहकाने ऑगष्ट 2009 मध्ये बिलावरील व्याज रूपये 117/– भरलेले आह असे रिकार्डवरून दिसते.

गैरअर्जदाराने ऑगष्ट 2009 चे वीजेचे बिल हे फॉल्टी मिटरमुळे आकारल्याचे मान्य केलेले आहे. व त्याप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे. ग्राहकाचे योग्य वीज बिल रूपये 622=72 इतके असल्यामुळे तो ऑगष्ट 2009 चे वीज बिलाचे व्याज भरण्यास जबाबदार ठरत नाही. म्हणुन सदर व्याजाची रक्कम ग्राहकास परत करण्यात यावी असे मंचास वाटते.

सदर ग्राहकाने हया मंचा समोर गा–हाणे देण्यापूर्वी विविध स्तरावरील अधिका–यांना वेळोवेळी तक्रार दिलेली आहे. त्यांनी पाच वेळा तक्रार केलेली असुन त्या तक्रारीचे निरसन झालेले नाही. व ग्राहकास हया मंचा समोर आल्यानंतर तक्रारीचे निरसन करण्यात आलेले आहे. हि बाब अतिशय गंभीर आहे. याची नोंद संबधीत अधिका–यांनी घ्यावी.

मंचापुढे दोन्ही पक्षांनी सादर केलेली कागदपत्रे, पुरावे तपासले आणि दोन्ही पक्षांचे लिखित व तोंडी म्हणणे ऐकुन घेवून मंचानी दोन्ही बाजुचा विचार करून खालील निर्णय घेतला.

## निर्णय

सदर तक्रार अर्ज अशंतः मंजूर करण्यांत येत आहे.

मंच अशा निष्कर्षास पोहचला आहे की, गैरअर्जदाराने तक्रार कर्त्यास आकारलेले व्याज रू. 117/— परत करण्यात यावे.

गैरअर्जदाराला आदेश देण्यात येत आहे की कार्यवाही बाबतचा पुर्तता अहवाल हया मंचास आदेश पारीत केल्याचा तारखे पासुन 30 दिवसांचे आत कळवावा.

| | | |
|---|---|---|
| (एस.एफ. लांजेवार) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य — सचिव | सदस्या् | सभापती |

ग्राहक गा—हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.